


साप्ताहिक www.dongarcharaja.com वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे




■ वर्ष ८ ■ अंक ३८ ■ बुधवार, दि.२९ मार्च २०२३ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-143-2021-2023 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.

# वडवणी नगरपंचायतचा वसुलीमध्ये उच्चांक

## नागरिकांच्या सहकार्यातून घरपट्टी ७७ टक्के तर नळपट्टी ६० टक्के वसुली



डोंगरचा राजा / विशेष वृत्त

**वडवणी नगरपंचायत चे नगराध्यक्ष शेषेराव जगताप व उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांच्या सूचनेनुसार वडवणी नगरपंचायत ने मार्च अखेरपर्यंत घरपट्टी आणि नळपट्टी वसुली मोहीम राबविली. यामध्ये शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने घरपट्टीमध्ये ७७.४८ टक्के तर नळपट्टीमध्ये ६० टक्के वसुली झाल्याचे मुख्याधिकारी श्री.जोशी यांनी सांगितले. त्याच बरोबर आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ नगरपंचायत कार्यालयाकडून उपाययोजना व नियोजन केले जात आहे.आगामी काळात तापमानात मोठी वाढ होण्याचे संकेत मिळाले असून त्यामुळे पावसाचे प्रमाण देखील कमी प्रमाणात असणार आहे.निश्चितच यामुळे पाणी प्रश्न भेडसावणार असल्याने नगरपंचायत ने देखील रमजान ईद सणाच्या नंतर पाणी पुरवठा दर चार दिवसाला करण्याचे नियोजन केले आहे.**

### आगामी काळात पाणी प्रश्न भेडसावणार

### रमजान ईद सणाच्या नंतर दर तीन दिवसांऐवजी दर चार दिवसाला पाणी मिळणार

### नगराध्यक्ष शेषेराव जगताप उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांच्या सुचना कामी आल्या

याबाबत अधिक वृत्त असे की वडवणी नगरपंचायत अंतर्गत नगराध्यक्ष शेषेराव जगताप,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनी शहरातील नागरिकांना आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा त्रास होऊ नये या मुख्य विषयाला सामोरे जात उत्कृष्ट नियोजन केले आहे. अल – निनो समुद्र प्रवाह सक्रीयता तसेच संभाव्य पाणीटंचाई निवारणा करिता विशेष कृती आराखडा तयार करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार दक्षिण पेसिपिक महासागरात अल – निनो या समुद्र प्रवाहाच्या सक्रियतेमुळे देशातील मान्सून पर्जन्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे माहे जून २०२३ नंतर देखील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणाच्या उपाययोजना राबविणे आवश्यक राहील तसेच चालू होणाऱ्या तीव्र उष्णतेचा लाटा येण्याच्या संभावना आहेत. तीव्र उष्णतेमुळे पाण्याच्या बाष्पीभवनामुळे होणारा ह्रास विचारात घेता अचानक रित्या पाणीसाठा खालावू शकतो. या परिस्थितीत आगामी कालावधीत पिण्याच्या पाण्याची टंचाईची परिस्थिती सर्वसाधारण स्थिती पेक्षा गंभीर होऊ शकते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या निर्देशाचा विचार करता संबंधित यंत्रणांना काही सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आगामी कालावधीत अल – निनो या मान्सून वरील परिणाम हिंदी महासागरावरील ध्रुवीय स्थिती इत्यादी स्थितीनुसार भारतीय हवामान विभाग यांच्याकडून माहे एप्रिल २०२३ मध्ये प्राप्त होणाऱ्या सविस्तर अंदाजानुसार आगामी कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारण्याच्या अनुषंगाने उचित निर्देश येतील.

सूचनानुसार तातडीने कारवाई करून त्याचा अहवाल देखील वरिष्ठ कार्यालयाने मागवलेला आहे. त्यामुळे वडवणी शहरांमधील नागरिकांना निगडित पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना नियोजन बद्ध राबविण्याच्या सुचना मिळालेल्या आहेत. त्यानुसार वडवणी नगरपंचायत चे नगराध्यक्ष शेषेराव जगताप उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांच्या आदेशानुसार वडवणी नगरपंचायत चे मुख्याधिकारी श्री.जोशी यांच्या नियोजनबद्ध आराखड्यानुसार नगरपंचायत कार्यालयीन प्रमुख प्रेम मस्के,त्याचबरोबर रवींद्र साळुंखे यांच्या सूचनेनुसार नगरपंचायत चे कर्मचारी अरविंद उजगरे,रामेश्वर शिंदे,विक्रम मुंडे,रामेश्वर गुरसाळी,सारंगधर कुरकुटे,कैलास शिंदे,धम्मा साळवे,मुन्ना सय्यद या कर्मचाऱ्यांनी शहरातील नागरिकांना विश्वासात घेऊन घरपट्टी – नळपट्टी भरण्याबाबत कळवले. नागरिकांनी देखील आपल्याकडील थकीत असलेली घरपट्टी – नळपट्टी सढळ हाताने भरण्यास उत्सुकता दाखवल्यामुळे शहरातील नागरिकांकडे थकीत असलेली नळपट्टी ३० लाख १७ हजार रुपये पैकी ६० टक्के वसुली करण्यात आली आहे.त्याचबरोबर थकीत घरपट्टी एकूण २० लाख ६० हजार रुपये पैकी ७७.४८ टक्के वसुली करण्यात आली आहे.

### पाण्याचा वापर जपून करावा:नगराध्यक्ष शेषेराव जगताप

आगामी काळामध्ये तीव्र स्वरूपात पाणीटंचाई निर्माण होण्याची संकेत मिळाले असून वडवणी शहरातील नागरिकांनी सुद्धा आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसाठी पिण्याच्या पाण्याचा योग्य रीतीने वापर करावा. पाणी जपून वापरावे. आपण नगरपंचायत च्या माध्यमातून सुरुवातीला तीन दिवसाला पाणी पुरवठा करत होतो.आता मात्र उन्हाळ्याची चाहूल लागतात. वरिष्ठांच्या सूचनेनुसार पाणी कपात मोहीम हाती घेतली आहे. आपण आजपर्यंत दर तीन दिवसाला पाणी पुरवठा करत होतो. त्या ऐवजी आता दर चार दिवसाला नगरपंचायत च्या मार्फत पाणी पुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे तमाम नागरिकांनी येत्या रमजान ईद सणाच्या नंतर सुरू होणारी ही मोहीम यशस्वीपणे राबविण्याकरिता सहकार्य करण्याचे आवाहन नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी डोंगरचा राजा शी बोलतांना केले.



# आ.प्रकाश दादांचे विरोधकांना खुले आव्हान



माजलगाव :प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व मित्र पक्षाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती व तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळ निवडणूक २०२३ निमित्ताने भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

माजलगाव मतदारसंघाच्या राजकारणात सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालण्याच काम आजतागायत केले आहे आणि यापुढेही केले जाईल असे प्रतिपादन यावेळी प्रकाशदादा सोळंके यांनी दिले.

विरोधकांना किती एकत्र यायचा प्रयत्न केला तरी या दोन्ही निवडणुकीत त्यांना चितपट केले जाईल आणि मतदार करतीलच. विरोधकांना त्यांची खरी ताकद दाखवुनच द्यायची असेल तर पंचायत समिती,जिल्हापरिषद अशा जनतेने हातात घेतलेल्या निवडणुकीत सामोरं येण्याचं आव्हान देखील यावेळी प्रकाशदादा सोळंके यांनी म्हटले आहे.

नेते सोडून जात असताना सामान्य माणूस दादांसोबत उभा होता:बाबूराव पोटभरे

या मध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे व प्रमुख उपस्थिती अशोक डक, जयसिंग सोळंके, दयानंद स्वामी, संभाजी शेजुळ, चंद्रकांत शेजुळ, अरूणराव इंगळे, कल्याण आबुज, अच्युतराव लाटे, खुशिद नाईक, राजेश घोडे, मनोहर डाके, शरद चव्हाण, डॉ.वसीम मनसबदार, प्रकाश गवते, सुरेंद्र रेदासणी, कचरू खळगे, एन.टी.सोळंके सह तालुक्यातील सोसायटीचे चेअरमन सर्व संचालक, ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच,व्यापारी, हमाल मापाडीचे सर्व मतदार सर्व सदस्य रा.काँ.पक्षाचे व मित्र पक्षाचे नेते व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



# कार्यकर्त्यांसाठी बाजार समिती – खरेदी विक्री संघ निवडणुकीत उतरणार :मोहनराव जगताप

माजलगाव : प्रतिनिधी

नगरपालिका, जिल्हा परिषद पंचायत समिती बाजार समिती खरेदी विक्री संघ या कार्यकर्त्यांना संधी देणाऱ्या निवडणुका असतात म्हणून त्या कार्यकर्त्यांना या निवडणुकीच्या माध्यमातून संधी देण्यासाठी असतात. सध्या होत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती व खरेदी विक्री संघाच्या निवडणुका सुरू असून या निवडणुकीत मी कार्यकर्त्यासाठी पूर्ण ताकतीने काम करणार असल्याचे प्रतिपादन भाजप नेते मोहनराव जगताप यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती व खरेदी विक्री संघाच्या निवडणुकी अनुषंगाने संपर्क कार्यालयात सोमवार रोजी सकाळी अकरा वाजता बैठक आयोजित केली होती यावेळी केले.

यावेळी संतोष यादव, सुरेश एरंडे, नानाभाऊ शिंदे, तुकाराम येवले, सरपंच अजय शिंदे, मारोती विटेकर, अविनाश गोंडे,बंडु खांडेकर, श्रीकृष्ण सोंळके, ईश्वर होके, दिपक जाधव, भालचंद्र सोळंके,रावसाहेब गायकवाड, दत्तात्रय वाळस्कर,गोपाळराव डाके, अप्पा उजगरे,एकनाथ डाके, नितिन काळे, वसंत अलकुंटे, फेरोज इनामदार,पापालाल राठोड, भास्कर कचरे, जगदीश बादाडे,अंगद कटके,त्रिंबक धिरडे,हितेंद्र काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.पुढे बोलतांना मोहनराव जगताप म्हणाले की, मी अनेक कार्यकर्त्यांना गुलाल लावले अनेकांना पदावर बसवले त्या लोकांनी मला धोका दिला.यावेळेस मात्र मी कार्यकर्त्याच्या होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये खंबीरपणे पाठीमागे राहणार असून कोणता कार्यकर्ता कसा हे ओळखूनच त्या कार्यकर्त्यांना गुलाल लावण्यासाठी मी प्रमाणिक प्रयत्न करणार आहे. या निवडणुकीमध्ये कसल्याही प्रकारची घराणेशाही चालणार नसून माझ्या घरातला एकही उमेदवार निवडणुकीमध्ये उभा राहणार नसून फक्त कार्यकर्त्यांना बळ देणार आहे. कार्यकर्त्याच्या पाठीमागे मी जर यावेळेस राहिलो तर माझ्या निवडणुकीच्या वेळेस हेच कार्यकर्ते माझ्या पाठीमागे राहतील व मला आमदार करतील सोमवार रोजी आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत भाजप नेते मोहनराव जगताप बोलत होते. यावेळी बाजार समितीचे माजी सभापती नितिन नाईकवरे बोलतांना म्हणाले की संघर्ष केल्याशिवाय कोणतेच यश हाती लागत नाही. मी पाच वर्षे उपसभापती राहिलो व नंतर सभापती राहिलो सभापतीच्या काळात अनेक संघर्ष केले. त्यावेळेस मी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होतो त्यावेळेस अनेक योजना शेतकऱ्यांसाठी केल्या यामध्ये महाराष्ट्रातील पहिली शेतकऱ्यांसाठी एक रुपयात जेवण ही योजना चालू केली तर पत्रकारांच्या सहकार्याने सिंदफना नदी पात्र स्वच्छ केले यासह शहरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. पुन्हा शेतकऱ्याचं हित जपायचे असेल तर बाजार समिती भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे असे आवाहनही माजी सभापती नितीन नाईकनवरे यांनी कार्यकर्त्यांना केले. यावेळी माजलगाव तालुक्यातील खरेदी विक्री संघ व कृषी उत्पन्न बाजार समितीचे उमेदवार व मतदार सह कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### बैठकांपासून रमेश आडसकर दूर!

भाजपाचे गतवेळचे विधानसभेचे उमेदवार रमेश आडसकर यांनी निवडणूकीनंतरही मतदारसंघातील संपर्क कायम ठेवला आहे. आता बाजार समिती, खरेदी विक्री संघ निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचाही यात सक्रीय सहभाग असणे अपेक्षित असतांना ते मात्र या बैठकांपासून दूर असल्याने भाजपा कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे.

# वडवणी येथील शासकीय आयटीआयची दुरवस्था

## प्रभारी प्राचार्यावर चालतो कारभार; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान





वडवणी :प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील गोरगरीब व सर्वसामान्य जनतेच्या विद्यार्थ्यांना कौशल्य, उद्योजक ,व्यवसाय शिक्षण मिळावे यासाठी राज्य शासनाच्या वतीने वडवणी येथील चिंचवण रोडवरील खाजगी किरायाचे इमारतीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआयची स्थापना सन २००७ मध्ये करण्यात आलेली असून या ठिकाणी अनेक ट्रेड जागे अभावी लाखो रुपयांचे मशीनरी, वाहन जागेवर बंद असून धुळखात पडुन आहेत तसेच सध्या स्थितीत या ठिकाणी शिक्षण घेत असणाऱ्या शेकडो विद्यार्थी, विद्यार्थिनींना अपुऱ्या जागेत शिक्षण घ्यावे लागते तसेच या ठिकाणी विद्यार्थ्यांना पिण्याची पाण्याची ,शौचालयाची सोय नाही तसेच या विद्यालयाला प्राचार्य ही प्रभारी आहेत त्यामुळे या शासकीय आयटीआयची अत्यंत दुरावस्था झाल्याचे दिसून येते तसेच या ठिकाणी सुविधाचा हि मोठ्या प्रमाणात अभाव आहे.

वडवणी तालुका हा डोंगराळ व ऊसतोड मजुरांचा तालुका म्हणून ओळखला जातो तरी या तालुक्यातील गोरगरीब, सर्व सामान्य जनतेचे मुलांना पुस्तकी द्याना बरोबरच प्रात्यक्षिक औद्योगिक,व्यवसायिक प्रशिक्षण मिळावे व त्यांचा स्वतःचा व्यवसाय असावा किंवा विविध कंपन्यां मध्ये त्यांना रोजगार मिळावा यासाठी शासनाने वडवणी येथील खाजगी किरायाचे इमारतीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआयची सुरूवात सन २००७ सारी करण्यात आलेली आहे सध्या स्थितीत या ठिकाणी इलेक्ट्रिसियन ,फिटर(जोडारी), इलेक्ट्रॉनिक्स मेकेनिकल,कोपा, शिवणकाम (फशेन डिझाईन टेक्नॉलॉजी ) हे ५ ट्रेड साठी १०० पेक्षा जास्त विद्यार्थी, (पान २ वर)

■ या शासकीय आयटीआयच्या मार्फत मानव विकास योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवुन मानव निर्देशांक वाढविण्यासाठी प्रयत्न झाले होते यामध्ये शिलाई मशिन प्रशिक्षण,वाहन चालविणे प्रशिक्षण यासह इतर ट्रेड राबविण्यात आले होते.तसेच विद्यार्थ्यांना मोफत शिलाई मशीन, अनुदान भत्ता, साहित्य देण्यात आले होते.

■ शासकीय आयटीआयची भव्य इमारत बांधकाम करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून जागेचा प्रश्न रखडलेला असुन यामध्ये वडवणी शहरा जवळील जागा मिळणे आवश्यक असताना वडवणी पासून ८ किलो मीटर अंतरावर असलेल्या पुसरा येथील शासकीय गायरानातील चार एकर जमीन शासनाने दिली असून परंतु या ठिकाणी आयटीआय झाल्यास विद्यार्थी,शिक्षक यांची येण्या जाण्यासाठी गैरसोय होणार आहे.असे पालकां कडुन बोलले जात आहे.

■ विद्यार्थ्यांना मोटार मेकॅनिकल ट्रेड साठी वाहन उपलब्ध करण्यात आलेले आहे परंतु हा ट्रेंड जागे अभावी बंद असल्याने वाहन गेल्या अनेक वर्षांपासून जागेवरच बंद असून नादुरुस्त, धुळखात उभे आहे.

## संपादकीय

# दरवर्षी नवे संकट?

आगामी प्रत्येक वर्षातील मार्च महिन्यात कोरोनाची किंवा नव्या विषाणूंची भीती कायम राहणारच का? तर याला तज्ञांचे उत्तर अंशतः 'हो' असेच आहे. याला सबळ कारणे दिली जात आहेत. लसीकरण होऊन संपलेला कालावधी, तिसऱ्या बुस्टरडोसची केलेली हेळसांड, आणि बरेच काही यातून कोणत्याही लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित होते. जर हा संसर्ग टाळायचा असल्यास कोविड वर्तणुकीच्या आधीन राहूनच व्यवहार करावे लागतील. अन्यथा मृत्यूचे भय नसले तरी संसर्ग होणारच नाही याची खात्री कोणीच देताना दिसत नाही

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून राज्यातील कोरोना रुग्ण संख्या वाढण्यास सुरुवात झाली. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपता संपता आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी रुग्णवाढीचा दर ३ टक्के असल्याचे सांगितले. यापुढील प्रत्येक महिन्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढण्याची भीती राहणारच का? या सर्वसामान्यांच्या शंकेला तुर्तास तज्ञांनी अंशतः 'हो' असेच उत्तर दिले आहे. जर हे टाळायचे असल्यास कोविड प्रोटोकॉलचे (मास्क पासून लसीकरणापर्यंत सर्वकाही) पालन करावेच लागेल. याला कारण म्हणजे राज्यातील लसीकरणाला आता दिड वर्ष उलटले असून लसीकरणामुळे निर्माण झालेली शरिरातील प्रतिपिंडे आता कमी झाली आहेत. त्यातही तिसऱ्या म्हणजेच बुस्टर डोस घेताना प्रत्येकाने हेळसांड केली. समुपदेशन तसेच आणि इतर संसर्गाच्या शक्यअशक्यता सांगूनही बुस्टर डोस टाळलेल्याची संख्या मोठी आहे. त्यामुळे सुरु असलेल्या लसीकरणाला लोकांनी प्राधान्य द्यावे तसेच कोविड वर्तणुकीच्या अधीन राहूनच व्यवहार करावे लागतील असा इशारा राज्य कोविड टास्क फोर्सचे तज्ञ देत आहेत. राज्याच्या सर्वोच्च सभागृहात आरोग्य मंत्र्यांनी जबाबदारीने माहिती देताना काळजी घेण्याचे आवाहन देखील केले. तुर्तास आरोग्य यंत्रणा कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची क्षमता ठेवत असली तरी देखील जबाबदारी म्हणून कोविड प्रोटोकॉल पाळा अशा सूचना होत आहेत. मार्च महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यातच रुग्णसंख्या दुपटीने वाढत असल्याचे पेंद्रीय आरोग्य विभागाने सांगितले. केंद्रात संबंधित विषयावर बैठका होऊ लागल्या. सज्जता आणि विविध उपाययोजनांचे मूल्यमापन करण्याच्या सूचना राज्यांना देण्यात आल्या. सहा राज्यांमध्ये कोरोना आणि व्हेरिएंटचे रुग्ण वाढत असल्याचे नमूद करण्यात आले. या सहा राज्यात महाराष्ट्र आहे. महाराष्ट्रात रविवार म्हणजेच २६ मार्च पर्यंत ३ हजार ४५ एवढे कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. मार्च महिन्यातील दैनंदिन नोंद पाहिल्यास त्यातील वाढ स्पष्ट होते. जसे १० मार्च रोजी ९३ एवढी कोरोना नोंद दोन अंकात होती. तर पाच दिवसात म्हणजेच १५ मार्च रोजी १७६ एवढी झाली. २० मार्च रोजी किंचित कमी होत १२८ एवढी झाली असली तरी आगामी दोन दिवसात म्हणजे २२ मार्च रोजी ३३४ तर २६ मार्च रोजी ३९७ अशी तिप्पट वाढ दिसून आली. ही वाढ पाचशेच्या घरात जाऊ नये अशी तज्ञांची आणि आरोग्य यंत्रणेची अपेक्षा आहे. राज्यात कोविड १९, एच१एन१, एच३एन३ आणि एन्फ्ल्यूएन्जा रुग्णांची वाढ पाहून आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी आरोग्य यंत्रणेचा आढावा स्पष्ट केला. या रुग्णवाढीमुळे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांनी आढावा बैठक घेतली. दरम्यान, आरोग्य यंत्रणा पुर्ववत करण्याच्या सूचना दिल्या. राज्यात ४ हजार पेक्षा जास्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुन्हा प्रशिक्षण देण्यात आले आहे. गंभीर, आजारी, वफध्द, अति झोपेच्या व्यक्ती आरोग्य कर्मचारी यांना मोफत लसीकरण केले आहे. प्रत्येक जिह्यांचे सर्वेक्षण आणि लसीकरण, बूस्टर डोस देण्यासाठी प्रवफत्त करावे, असे आदेश दिले आहेत. लसीकरणाच्या उपलब्ध साठ्याचा आढावा घेण्यात आल्याचे मंत्री सावंत यांनी सांगितले. तसेच नव्या व्हेरिएंटमुळे धोका वाढत आहे. राज्यातील एच१एन१ बाधितांची संख्या वाढत असून तिघांचा मफत्यू झाला आहे. तर एच३एन२ बाधित संख्या १९५ असून त्यापैकी एकाचा मफत्यू झाला आहे. तर एन्फ्ल्यूएन्जाचे संशयीत रुग्ण ३ लाख ११ हजार १९२ इतके आहेत. त्यामध्ये बाधित रुग्ण एच१एन१ चे ११७ आणि एच३एन२ चे बाधित रुग्ण २४९ इतके रुग्ण आहेत. रुग्णालयात उपचार घेत असलेले १६० रुग्ण आहेत. या रुग्णांमध्ये एच१एन१ मुळे मफत्यू झालेल्या रुग्णांची संख्या तीन असून एच३एन२ मुळे एकाचा मफत्यू झाल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. ज्या ठिकाणी कोविड रुग्णवाढ, नवे व्हेरिएंटचे रुग्ण आणि मृत्यू दिसून येत आहेत अशा राज्यांना केंद्र सतत सूचना देत आहे. यातूनच राज्यांना खबरदारी घेण्याचे आदेश दिले जात आहेत. तोंडावर रुमाल, व्यक्तींमध्ये अंतर, सॅनिटाइझरचा वापर या त्रिसुत्रीचा वापर करावयाच्या सूचना पुन्हा पुन्हा दिल्या जात आहेत. त्याचवेळी तीव्र श्वसनाचा त्रास होणाऱ्या रुग्णांनी स्वतःहून गर्दीत जाणे टाळावे यासारखी आवाहने केली जात आहेत. यंत्रणेला रुग्ण वाढ रोखण्यासाठी चाचण्या तसेच संशयित नमुन्यांचे जीनोम सिक्वेंसींग करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. ज्येष्ठ नागरिक, अंथरुणाला खिळलेले रुग्ण, मधुमेही, रक्तदाबाचे तसेच कर्करुग्ण यासह मूत्रपिंडांचे आजार असलेल्या रुग्णांना मास्कचा वापर करण्यास सुचविले जात आहे.

# कर्जत येथील मेळाव्यास जास्तीत जास्त तालुका, जिल्हाध्यक्षांनी उपस्थित रहावे : एस.एम देशमुख



कर्जत :प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेतर्फे राज्यातील तालुका पत्रकार संघाचा राज्यस्तरीय मेळावा आणि आदर्श तालुका, जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा दि ७ एप्रिल २०२३ रोजी कर्जत (जिल्हा अहमदनगर) येथील शारदाबाई पवार सभागृहात होणार आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी शुक्रवारी कार्यक्रम स्थळाची पाहणी केली. या मेळाव्याच्या संयोजनाची जबाबदारी कर्जत आणि जामखेड येथील पत्रकारांनी संयुक्तपणे घेतली आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी श्री. देशमुख यांनी सूचना केल्या. मेळाव्यास तालुका, जिल्हाध्यक्ष तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन यावेळी एस.एम.देशमुख यांनी केले.

कार्यक्रम कर्जत येथे होत असला तरी कर्जत आणि जामखेडच्या पत्रकार संघांनी यजमानपद स्वीकारलेलं आहे.. त्यासाठी तालुक्यातील पत्रकारांनी विविध समित्या स्थापन करून कामांचे वाटप केले आहे. त्यानुसार जोरदार तयारीही सुरू केली आहे.

एस.एम देशमुख यांच्या समवेत ज्येष्ठ पत्रकार शोभनाताई देशमुख, राज्य सरचिटणीस मन्सूरभाई शेख, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष अनिल वाघमारे, बीड जिल्हाध्यक्ष जितेंद्र शिरसाट, बीड जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, ज्येष्ठ पत्रकार विजयसिंह होलम, आदीसह कर्जत मधील पत्रकार गणेश जेवरे, आशिष बोरा, योगेश गांगर्डे, भाऊसाहेब तोरडमल, मच्छिंद्र अनारसे, मोतीराम शिंदे, अस्लम पठाण, जामखेडचे पत्रकार अविनाश बोधले, सुदाम वराट, अशोक वीर, किरण रेडे, पप्पूभई सय्यद आदी उपस्थित होते. दिनांक २४ मार्च २०२३ रोजी देशमुख यांच्यासह सर्वांनी कार्यक्रम स्थळाची पाहणी करताना राज्यभरातून येणाऱ्या पत्रकाराच्या राहण्यासह इतर व्यवस्थेचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे आमदार रोहित पवार हे स्वागताध्यक्ष आहेत. त्यांनीच कर्जत येथे हा कार्यक्रम कर्जतच्या दादा पाटील महाविद्यालयातील शारदाबाई पवार सभागृहात व्हावा, यासाठी आग्रह धरला. या सभागृहाचे उपस्थित सर्वांनीच कौतुक करत तालुका स्तरावर इतके सुंदर सभागृह ग्रामीण भागात कुठेही नसल्याचे म्हटले. या पाहणी नंतर बैठक झाली. यावेळी गणेश जेवरे यांनी सूत्रसंचलन केले एस एम देशमुख यांनी बोलताना संघटनेचे महत्व सांगितले. ते म्हणाले, 'मराठी पत्रकारांची ही देशातील एक नंबरची संघटना आहे. पत्रकारांच्या संघटना अनेक असल्या तरी पत्रकाराचे प्रश्न समान आहेत. त्यामुळे सर्वांनी एकत्र येत हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत..,' यावेळी त्यांनी कार्यक्रमाचे स्वरूप विषद केले.. शेवटी आशिष बोरा यांनी कर्जत तालुक्यातील विविध देवस्थान व पर्यटन स्थळाची माहिती देऊन सर्वाचे आभार मानले. कर्जत तालुक्यात होणाऱ्या राज्यस्तरीय या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी सर्वजण सहकार्य करतील असा विश्वास कर्जत मधील पत्रकारांनी उपस्थित सर्वांना दिला.



# वडवणी तालुक्यात महापुरुष सामान्यज्ञान परीक्षेत उदंड प्रतिसाद

वडवणी : प्रतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती बीड यांच्या प्रेरणेने जिल्हाभरात एक अनोखा पॅटर्न २०२३ पासून सुरू करण्यात आला. हा पॅटर्न अतिशय प्रशंसनीय व उल्लेखनीय असा राबविण्यात आला व त्याचे नियोजन करण्यात आलं

याचा सविस्तर वृत्तांत असा की बीड जिल्ह्यात वडवणी हा एक छोटासा तालुका या वडवणी तालुक्यातून व खेड्यापाड्यातील हायस्कूल - कॉलेजमधून आपले सामान्य ज्ञान आजमावण्यासाठी ३०१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. वडवणी ,वडवणी परिसर व इतर खेड्यातून विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. यावेळी महाराणी ताराबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात केंद्र असल्याने महापुरुष सामान्य ज्ञान परीक्षा या शाळेत घेण्यात आली यावेळी १२ हॉल करण्यात आले होते.महापुरुष सामान्य ज्ञान परीक्षेचे केंद्रसंचालक म्हणून प्रा राहुल कांबळे हे होते व त्यांना विशेष सहकार्य या विद्यालयाचे उपप्राचार्य अशोक मस्के यांनी केले .प्रा राहुल कांबळे केंद्र संचालक यांच्या उत्कृष्ट नियोजनातून ही परीक्षा संपन्न झाली या शाळेत १0वी व १२ वी चे केंद्र असल्यामुळे जवळपास २५ दिवस विद्यार्थी शाळेपासून दूर होते. तरीही वडवणी व वडवणी परिसरातील स्थानिक च्या ग्रुप वरून सदर परीक्षेची माहिती प्रसारीत केल्यामुळे प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी केंद्र संचालक प्रा. राहुल कांबळे यांची थोडीशी धावपळी झाली अचानक संख्या वाढल्याने प्रश्नपत्रिका कमी पडल्या त्यामुळे तळजोड करावी लागली .

यावेळी उपप्राचार्य अशोक मस्के, श्री डोईफोडे सर,प्रा चोपडे ,प्रा. वडमारे ,प्रा.धस सर, श्रीमती दिवेमॅडम,श्रीमती दंदे मॅडम, श्रीमती फलके मॅडम श्री उजगरे सर, प्रा. नागवेसर, श्री साकडे सर , श्री निवरकर सर ,श्री गिलबीले सर ,श्री चव्हाण सर व श्री मुंडे सर इत्यादी प्राध्यापक यांनी व पर्यवेक्षकांनी सहकार्य केले त्यांचेही संयोजन समितीने आभार व्यक्त केले.



# मी उद्योजक होणारच...

**कोणताही व्यवसाय अथवा उद्योग करायचा असेल तर त्या विषयातील पुरेपूर ज्ञान असायला हवे. त्यातही जो आपल्या आवडीचा विषय आहे, ज्यात आपल्याला पैशासोबतच आनंद मिळू शकतो अशा उद्योगधंद्याची निवड करावी.**

मुळात माझा 'पिंड' हा उद्योजकाचा आहे. त्यातच मला समर्थ सातारा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'मी उद्योजक होणारच' या विषयावर बोलण्याची संधी मिळाली. तसं तर विषय कोणताही असो, समोर दर्दी प्रेक्षकांची गर्दी असली की माझ्यातला वक्ता जागा होतो. आणि त्यातच विषय आपल्या आवडीचा असेल तर सभा गाजवायला व विषय रंगवायला आणखी मजा येते.

रविवार दि. २६ मार्च २०२३ रोजी रवींद्र नाट्यगृह प्रभादेवी, मुंबई येथे समर्थ सातारा प्रतिष्ठानच्या वतीने नव उद्योजकांना मार्गदर्शन करण्यासाठी भव्य मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रा. नितीन बानगुडे पाटील यांच्यासह खादी आणि ग्रामोद्योग भारत सरकार चे संचालक योगेश भामरे यांनाही निमंत्रित करण्यात आलं होत. मागच्या अनेक वर्षांपासून मी एक अधिकारी म्हणून महाराष्ट्र आणि दिल्लीत सेवा करत आहे. परंतु या संस्थेचे अध्यक्ष उद्योजक श्रीरंग केरेकर यांनी मी पूर्वी उद्योजक असल्याची माहिती सैनिक मित्र अशोक कदम व पोलीस मित्र रमेश देवरे यांच्या माध्यामातून काढली आणि मलाही या शिबिरात नवउद्योजकांशी हितगुज करण्यासाठी आग्रह धरला.

प्रा. नितीन बानगुडे पाटील हे माझे जेष्ठ बंधु डॉ. शिवरत्न शेटे यांचे खास स्नेही. या कार्यक्रमाच्या निमित्ताने एका प्रतिभावंत वक्त्याचे विचार ऐकायला मिळाले. तरुणांच्या उन्नतीसाठी असलेल्या राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती खादी आणि ग्रामोद्योगचे संचालक योगेश भामरे यांच्याकडून ऐकायला मिळाली. या कार्यक्रमात बोलतांना मी सुद्धा मागील आयुष्यात घडलेल्या अनेक बऱ्या वाईट घटनांच्या आठवणीत रमलो.

लहानपणापासूनच स्वतःच्या हिमतीवर काहीतरी करून दाखवायचे ही उर्मी अंगात होती. नागपूरला जाऊन तेथील एका टायर रिमोल्डिंगच्या कंपनीत साध्या वर्कर प्रमाणे

**डॉ.ओमप्रकाश स.शेटे**

राहून काम शिकलो. तिथे असेपर्यंत मी एका सधन कुटुंबातील आहे हे कोणालाही माहीत नव्हते. त्यानंतर स्वतःचा टायर रिमोल्डिंग चा व्यवसाय सुरू केला. आणि या व्यवसायात चांगला जम सुद्धा बसवला. परंतु हे करत असतानाच एका व्यक्तीच्या सल्ल्याने 'ॲग्रोकोल इंडस्ट्रीज' टाकण्याचा निर्णय घेतला. लाखो रुपयांचे कर्ज घेऊन इंडस्ट्री उभा देखील केली. मात्र मशीन पुरवठा करणाऱ्या व्यक्तीने फसवणूक केली. एकीकडे कंपनी चालू होत नव्हती तर दुसरीकडे कर्जाचा डोंगर वाढतच होता. एका व्यवसायात कमावलेले सर्व पैसे नव्या व्यवसायात गमवून बसलो होतो. काय करावे सुचत नव्हते, नवीन काही करण्याच्या नादात हातात होते ते सुद्धा गमावून बसलो. मती गुंग झाली होती, डोके चालत नव्हते परंतु मला तारले ते छत्रपती शिवाजी महाराज या तीन अक्षरी मंत्राने...

व्यवसायासाठी आपण तर केवळ आपली प्रॉपर्टी तारण ठेवतो. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या स्वराज्यासाठी स्वतःच्या मुलाला तारण ठेवले होते हे उदाहरण पावलोपावली प्रेरणा देत होते. हतबल झालो किंवा नकारात्मक विचार मनात येऊ लागले तर शिवरायांचे चरित्र वाचायचे, कितीही संकटे आली तरी तिला पुरून उरायचे अशी शिकवण बंधुराज सुप्रसिद्ध शिवव्याख्याते डॉक्टर शिवरत्न शेटे यांनी दिलेली असल्यामुळे न डगमगता आयुष्यात पुन्हा उभा राहिलो.

कोणताही व्यवसाय अथवा उद्योग करायचा असेल तर त्या विषयातील पुरेपूर ज्ञान असायला हवे. त्यातही जो आपल्या आवडीचा विषय आहे, ज्यात आपल्याला पैशासोबतच आनंद मिळू शकतो अशा उद्योगधंद्याची निवड करावी. लिखोटी, हातोटी आणि सचोटी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून कोणताही व्यवसाय केला तर त्यात हमखास यश मिळते अशी शिकवण माझे वडील नेहमी द्यायचे. संघर्ष व मेहनत करण्याची तयारी असेल तर यश तुमच्या पायाशी लोळण घेते यात तिळमात्र शंका नाही. मलाही जर माझ्या व्यवसायात अडचणी आल्या नसत्या, मला संघर्ष करायची गरज पडली नसती तर मी सुद्धा इथपर्यंत प्रगती करू शकलो नसतो. कारण आपल्यावर आलेली 'वेळ' आपल्याला मार्ग शोधायला भाग पाडते. वारंवार येणारी संकटे तुम्हाला आणखी मजबूत करतात. त्यामुळे तरुणांनी खचून न जाता हिमतीने परिस्थितीला सामोरे जावे व स्वतःच्या पायावर उभा राहून व्यवसाय उद्योगाची निर्मिती करावी. कारण संत महंतांची आपल्याला शिकवण आहे, 'प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे'. स्वामी विवेकानंद सांगतात की, 'युवकांनो झेप घ्या, दिशा तुम्हाला शरण येतील.' मला जर 'धाडस' करायचे असेल तर मी प्रतापगडावर जातो आणि एखादी कोंडी फुटत नसेल तर पन्हाळ्यावर जातो. कारण छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे 'गड' तुम्हाला जगण्याची प्रेरणा व दिशा देतात असा माझा अनुभव आहे.

## मासे पकडण्याचे जाळे चोरीला; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील सौंदडवस्ती येथील रामभाऊ जीरे यांचे मासे पकडण्याचे जाळे चोरीला गेले असुन त्यांचे लेखी तक्रारीवरून पोलिस स्टेशनमध्ये तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र अद्यापही आरोपींना अटक केली नाही.हेच आरोपी रामभाऊ जीरे व कुटुंबातील सदस्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत आहेत. पोलीसांनी या आरोपींना ताब्यात घेण्याची मागणी फिर्यादी रामभाऊ जीरे यांनी केली आहे.

रामभाऊ जीरे यांनी म्हटले आहे की, वडवणी शहरापासून जवळच असलेल्या सौंदडवस्ती या ठिकाणी मी राहत असून माझा मासे पकडण्याचा व्यवसाय आहे. मासे पकडुन विक्री करतो.त्यातून मिळालेल्या पैशातून मी माझी व माझ्या कुटुंबाचा भुक भागवतो. दिनांक १७/ ३/ २०२३ रोजी पहाटे साडेचार वाजता माझे मासे पकडण्यासाठी तलावात टाकलेले जाळे आरोपी माणिक सोनाजी कुलभाये, केसर सोनाजी कुलभाये,प्रियांका मानिक कुलभाये यांनी तिघांनी मिळून माशाचे जाळे घेऊन गेले व अनिल लुचारे यांचे घरी जाळे टाकले. व त्यातील काही माशांचे जाळे त्यांनी जाळून टाकून माझे नुकसान केले. मी त्यांना माझ्या जाळ्याचे नुकसान का केले असे विचारल्या वरून त्यांनी मला शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे सांगण्यावरून वडवणी पोलिस स्टेशनमध्ये वरील तिघांविरुद्ध दि.१८/३/२०२३ रोजी गुन्हा रजिस्टर नंबर ००५७/२०२३ प्रमाणे कलम ५०४,५०६, ३४,४२७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून फिर्यादी रामभाऊ जीरे यांनी आरोपींना ताब्यात घेण्याची मागणी केली आहे.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या प्रदेश प्रवक्तेपदी युवराज शिंदे यांची निवड

वडवणी:प्रतिनिधी

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या प्रदेश प्रवक्तेपदी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे यांची निवड करण्यात आली आहे.



युवराज शिंदे हे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या व बाराबलुतेदार अठरा आलुतेदार यांच्या माध्यमातून ओबीसी समाजातील विविध घटकांना एकत्र घेऊन ते काम करत आहेत.

या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील ओबीसी बाराबलुतेदार अठरा अलुतेदार शेतकरी शेतमजुर यांच्या हक्कासाठी सातत्याने लढा लढण्याचे काम करत आले आहेत म्हणून महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे विभागीय अध्यक्ष युवराज शिंदे यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या राज्य प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे.

गेल्या पंधरा वर्षांपासून वंचित उपेक्षित समाजाच्या प्रश्नावर महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणरावजी दळे यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना प्रत्येक गावामध्ये जाऊन समाजाचे काम करत होते निस्वार्थ, प्रमाणिक, काम करत असताना त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या राज्य प्रवक्तेपदी निवड करण्यात आली आहे.युवराज शिंदे यांच्यावर बीड जिल्ह्यासह राज्यभरातुन अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# विश्वजीत मुंडे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

परळी :प्रतिनिधी

शहरातील सुरभी प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्राचे संचालक व सामाजिक कार्यकर्ते विश्वजीत मुंडे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी संघा मार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार नुकताच जाहीर झाला असल्याची माहिती बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी समाजाच्या संस्थापक अध्यक्षा लक्ष्मीताई गरकळ यांनी दिली आहे.



बहुभाषिक भाऊ-बाबा वंजारी संघाच्या वतीने पुणे येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वंजारी संघाच्या मेळाव्यामध्ये विश्वजीत मुंडे यांना सन २०२३ चा समजभूषण पुरस्कार वितरित होणार आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल विश्वजीत मुंडे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. विश्वजीत मुंडे हे वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया सल्लागार म्हणून सर्व सामान्य विद्यार्थ्यांना महाराष्ट्रासह कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश येथे एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस., बी. डि.एस., बी.एच.एम.एस.तसेच वैद्यकीय पदव्युत्तर एम.ड ी., एम.डी.एस., एम.एस.या अभ्यासक्रमासाठी अनेक शासकीय व खाजगी महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला आहे. यामुळे विश्वजीत मुंडे हे शैक्षणिक व समाज कार्यात नेहमी अग्रेसर असतात. तसेच समाजहितासाठी त्यांचा सतत लढा चालू असून, त्यांनी आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेत बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी समाजाच्या संस्थापक अध्यक्षा लक्ष्मीताई गरकळ यांनी विश्वजीत मुंडे यांना राज्यस्तरीय २०२३ चा समाजभूषण पुरस्कार देण्याचे जाहीर केले आहे. येत्या ३ एप्रिल रोजी विश्वजीत मुंडे यांना सन्मानित केले जाणार आहे. या अगोदर विश्वजित मुंडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत श्रीनाथ मानव सेवा मंडळ नाथ्रा, ता. परळी वैजनाथ आयोजित सहावे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच प्रतिष्ठा फाऊडेशन सांगलीच्या वतीने समाजरत्न पुरस्कारने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे सर्व स्तरातून मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांकडून व तालुका व जिल्हा स्तरावर सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२९ मार्च २०२३ । पान ३




Mo:9923300876
7020546764
महेंद्र एस.उजगरे
विमा प्रतिनिधी
दि न्यु इंडिया इन्शोरन्स कं.लि.
शाखा : परळी वै.
सिरसाळा, ता.परळी वैजनाथ, जि.बीड.

# पत्रकारांच्या प्रगतीसाठी डिजिटल मीडिया परिषद खंबीरपणे काम करेल :अनिल वाघमारे

## जनजागृतीसाठी डिजिटल मीडियाची भूमिका महत्त्वाची : दिनकर शिंदे

## राज्यस्तरीय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहा:जितेंद्र सिरसाट



बीड : प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली डिजिटल मीडिया परिषद ही संस्था डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या पत्रकारांच्या सन्मान आणि प्रगतीसाठी प्रामाणिकपणे काम करेल असा विश्वास डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केला. तर येणाऱ्या काळात जनजागृतीसाठी प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचीही भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल असे स्पष्ट प्रतिपादन जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले. कर्जत येथे होणाऱ्या अ भा मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र शिरसाट यांनी केले आहे.

कर्जत जिल्हा अहमदनगर येथे दि ७ एप्रिल २०२३ रोजी होणाऱ्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय मेळावा आणि पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर बीडच्या शासकीय विश्रामगृह येथे २७ मार्च रोजी आयोजित डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हास्तरीय बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र शिरसाट, जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धार्थ धनवे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे म्हणाले की, अ भा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी भविष्याचा वेध घेऊन डिजिटल मीडिया परिषदेची निर्मिती केली आहे. येणाऱ्या काळात जनजागृतीसाठी प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचीही भूमिका अत्यंत महत्त्वाची भूमिका ठरणार आहे. त्यामुळे युट्युब चॅनल आणि पोर्टलचे काम करणाऱ्या पत्रकार बांधवांनी डिजिटल मीडिया परिषदेचे सदस्य होऊन नियोजनबद्ध काम करावे असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलताना राज्य कार्याध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की, पत्रकार संरक्षण कायद्याचे जनक एस एम देशमुख सर यांनी प्रिंट मीडियातील पत्रकारांसह डिजिटल मीडियात जनहितासाठी काम करणाऱ्या पत्रकारांनाही कायद्याचे संरक्षण मिळावे, आरोग्य विषयक सुविधा मिळाव्यात आणि शासनाच्या योजनांचाही लाभ मिळावा यासाठी काम सुरू केले आहे. सन्मानपूर्वक आणि प्रगतीसाठी डिजिटल मीडियातील पत्रकारांनी डिजिटल मीडिया परिषदेच्या छत्राखाली येऊन काम करावे असे आवाहन केले.डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र शिरसाट यांनी, ७ एप्रिल रोजी ''राईटर अँड फायटर ऑफ महाराष्ट्र'', एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कर्जत येथे होणाऱ्या अ भा मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय मेळाव्यास, बीड जिल्ह्यातील सर्व डिजिटल मीडियाच्या पत्रकारांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष संग्राम धनवे यांनी यूट्यूब चैनल सुरू करण्यापासून ते फॉलोवर्स वाढविण्यापर्यंत सखोल मार्गदर्शन केले. डिजिटल मीडिया परिषदेचे गेवराई तालुका सचिव सोमनाथ मोटे यांनी सर्वांचे आभार मानले.या जिल्हास्तरीय बैठकीस सुभाष शिंदे, श्याम जाधव, गणेश ढाकणे,ऍड जोगोजी साबणे, रामदास तपसे, नागेश औताडे, अमोल भांगे, इम्रान सौदागर, विजय आरकडे, गौतम बचुटे, अजय भांगे, मुबशीर खतीब आदींसह बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.



# बालवैज्ञानिकांचे मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने कौतुक

माजलगाव :प्रतिनिधी

मराठी विज्ञान परिषद माजलगाव विभागाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील इस्रो व नासा,खगोल संमेलन या अभ्यास दौ-यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मराठी विज्ञान परिषद माजलगाव विभागाचे उपाध्यक्ष आर.बी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व नवविकास मंडळाचे अध्यक्ष मा अ‍ॅड.एस.आर.शर्मा व नवविकास मंडळाचे उपाध्यक्ष अड.आर.डी. भिलेगावकर,प्रसिद्ध साहित्यिक महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त,पुर्व मुख्याध्यापक,विद्यार्थीप्रीय विज्ञान शिक्षक प्रभाकर साळेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी बोलताना कवी साळेगावकर म्हणाले की,हे उद्याच्या शास्त्रज्ञांनो,इस्रो नासा खगोल सम्मेलने सहभागाचे अगदी सुरुवातीपासूनचे अनुभव मराठीत तुम्ही लिहावेत. म.वि.प.माजलगाव त्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा व पुस्तक वितरणाची जबाबदारी घेत आहे.

अध्यक्षीय समारोपात आर.बी.देशमुख म्हणाले की, अगदी लहान लहान प्रयोगातून स्वतःची निरीक्षण कौशल्य विकसित करावे.निरीक्षणाच्या नोंद करण्याची सवय करावी. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक किशोर मोताळे यांनी केले. या अभ्यासदौर्याचे समन्वयक हंडीबाग सर,पालक विटेकर सर व नंदकुमार कुलकर्णी यांनी लक्षवेधी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात नासा साठी निवड झालेला विशाल पायके,इस्रोसाठी निवड झालेले ऋतुजा धनवडे व निकिता वाशिंबे तसेच बालवैज्ञानिक म्हणून गौरवलेला अभिनव विटेकर (सिंदफणा पब्लीक स्कुल) या सर्वांचा मराठी विज्ञान परिसदेच्या वतीने ग्रंथभेट पुष्पगुच्छाने कौतुक करण्यात आले. समारंभास बी.बी.शिंदे, सौ.धसकटे सुनिता, मोरेश्वर मसलेकर यांची ही व्यासपीठावर उपस्थिती होती. म.ज्यो .फुले प्राथमिक विद्यालयातील उत्कृष्ट वर्गशिक्षकांना यावेळी सन्मानित करण्यात आले. चि.अभिनव विटेकर ,ऋतुजा धनवडे यां बाल शास्त्रज्ञानी मनोगत मांडले. संतोष जोशी,मनिषा पाटील,उर्मिला झांबरे, सुषमा देडे , माधव कर्णे,प्रतिभा गणोरकर, शेख खमर,अर्चना भाले,विक्रम करडखेले या शिक्षकांसह अनेक विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक धोंडीराम रामुळे यांनी केले व आभार म.वि.प.चे कार्यवाह सुधीर देशमुख यांनी मानले.

# रत्नागिरी ठरला आदर्श जिल्हा मराठी पत्रकार संघ पुरस्काराचा मानकरी

मुंबई : प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारया रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघासाठी रत्नागिरी जिल्हा पत्रकार संघाची निवड करण्यात आली आहे. परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे यांनी आज येथे ही घोषणा केली.

मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी सर्वोत्कृष्ट काम करणारया तालुका आणि जिल्हा संघांना वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.. आदर्श तालुका पत्रकार संघाची घोषणा यापुर्वीच करण्यात आली आहे.. आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार रत्नागिरी जिल्हा पत्रकार संघाला आज जाहीर करण्यात आला आहे.. येत्या ७ एप्रिल २०२३ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे होणारया सोहळ्यात राज्यात सर्वोत्कृष्ट ठरलेल्या जिल्हा आणि तालुका संघांना सन्मानित करण्यात येणार आहे.

रत्नागिरी जिल्हा पत्रकार संघाने परिषदेने दिलेले उपक्रम तर राबविलेच त्याचबरोबर विविध सामाजिक उपक्रम राबवून पत्रकारांची प्रतिमा उंचविणयाचा प्रयत्न केला.. पत्रकार संघाने संगमेश्वर तालुक्यातील वांद्री हे गाव दत्तक घेऊन तेथील जनतेला सर्व प्रकारची आरोग्य व्यवस्था पुरविली.. अतिवृष्टीच्या काळात गरजूंना मोठी मदत केली.. तसेच राजकीय दबावाची पर्वा न करता जान्हवी पाटील, हेमंत वणजू, रत्नागिरी अध्यक्ष यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वारिशे हत्या प्रकरणात निर्णयाक भूमिका बजावत त्यांच्या कुटुंबीयांना मोठी मदत मिळवून दिली.. रत्नागिरीची निवड करताना या सर्व बाबींचा विचार केला.. एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस मन्सूरभाई, कोषाध्यक्ष विजय जोशी यांनी रत्नागिरी जिल्हा पत्रकार संघाचे, त्यांच्या पदाधिकारयांचे आणि सर्व सदस्यांचे अभिनंदन केले आहे.

# बनावट दारू विकणारा आकाश तेलंग स्थानबध्द

वडवणी : प्रतिनिधी

जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकुर यांनी अनेक माफीयांना स्थानबध्द केले आहे. दरम्यान हातभट्टीची बनावट दारु तयार करुण विक्री करणार्या आकाश लक्ष्मण तेलंग याला ताब्यात घेऊन एमपीडीऐ कायद्या अतंर्गत त्याला स्थानबध्द करण्यात आले. त्याची रवाणगी हार्सुल कारागृहात करण्यात आली आहे.

वारंवार कारवाई करूनही आकाश लक्ष्मण तेलंग (वय ३१ रा. दिंद्रुड हल्ली मुक्काम वडवणी) बनावट दारू तयार करून तीची विक्री करत होता. त्याच्यावर शिंदी तयार करण्याचा कारखाना चालविणे, तिची चोरटी विक्री व वाहतुक करणे, सोबत बाळगणे अशा स्वरुपाच्या १२ गुन्हयांची नोंद होती. यापैकी ९ गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन ३ गुन्हे तपासावर आहेत. त्याच्यावर कलम ११० प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु आकाश तेलंग हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा बनावट शिंदी दारु तयार करुन तिची विक्री करत होता. लोकांवर दहशत माजवत होता. यामुळे पोलिसांनी आकाश तेलंग याला ताब्यात घेऊन झोपडपट्टी दादा कायदा (एम.पीडीए) अंतर्गत स्थानबध्द करून त्याची हर्सुल कारागृह औरंगाबाद येथे रवानगी करण्यात आली. वरीष्ठ पोलिस अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सहाय्यक पोलिस निरिक्षक आनंद कांगुने, यादव, केदार, खरात, जायभाये, काकडे यांनी केली.

# वृक्षमित्र सुधाकर देशमुख राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई : प्रतिनिधी

वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांना पुणे येथील यशदा येथे राज्याचे वने सांस्कृतिक कार्यमंत्री व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

पुणे येथील यशदा येथे (दि.२६) मार्च रोजी आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला आहे. स्मृती चिन्ह, सन्मान पत्र आणि पंचाहत्तर हजार रुपयांचा धनादेश असं पुरस्काराचे स्वरुप होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. ना.चंद्रकात (दादा)पाटील (मंत्री उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण, वसत्रोउदयोग आणि संसदीय कार्य तथा पालक मंत्री, पुणे ), बी.वेणुगोपाल रेड्डी (सचिव वने महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई), वाय.एल. राव. प्रधान ( मुख्य वन संरक्षक, वनबल प्रमुख, महाराष्ट्र राज्य.नागपूर), डॉ.सुनिता सिंग. प्रधान ( मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण ,महाराष्ट्र राज्य पुणे), विवेक खांडेकर ( अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक मुख्यालय सामाजिक वनीकरण ,महाराष्ट्र राज्य पुणे ) यांची प्रमुख उपस्थिती होती.सुधाकर देशमुख हे अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर येथील रहिवासी आहेत. मागील ४१ वर्षांपासून देशमुख वृक्षारोपण,संवर्धन,बीज संगोपन आणि जनजागृतीचे काम करत आहेत. त्यांच्याकडे मोफत रोपवाटिका असून विविध समारंभात ते रोपे भेट देतात. याच कामाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. वृक्षमित्र देशमुख यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



# आगामी दोन वर्षात नऊशे हार्वेस्टरसाठी अनुदान देणार

बीड : प्रतिनिधी

राज्यात ऊस तोडणी व वाहतूकीचे काम हे ऊसतोडणी मजूरांमार्फत केले जाते. शासनाने ग्रामीण भागात विविध प्रकारच्या शैक्षणिक सुविधा तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यामुळे ग्रामीण भागातील मजूरांचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्तर उंचावला आहे. त्यामुळे मागील काही हंगामात राज्यातील ऊसतोडणी मजूरांची संख्या कमी होत असल्यामुळे ऊस तोडणीची समस्या भेडसावत आहे. वैयक्तिक शेतकरी, उद्योजक, सहकारी व खाजगी साखर कारखाने, शेती सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था () यांना ऊस तोडणी यंत्र खरेदी किंमतीच्या ४० टक्के अथवा ३५ लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल इतक्या रकमेइतके अनुदान देण्यात येणार असून बीड जिल्ह्यातील अर्जदारांनी या योजनेसाठी ऑनलाइन नोंदणी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले आहे.ऑनलाइन नोंदणीसाठी हे महा डीबीटी पोर्टलचे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावरील सूचनांप्रमाणे अर्ज भरावा. स्वतःचा मोबाईल, संगणक, लॅपटॉप, टॅबलेट, सामुदायिक सेवा केंद्र (), ग्रामपंचायतमधील संग्राम केंद्र यासारख्या माध्यमातून संकेत स्थळावर जाऊन अर्जदार अर्ज करू शकतील.राज्य शासनाने सन २०२२-२३ साठी ४५० व सन २०२३-२४ साठी ४५० असे दोन वर्ष कालावधीसाठी ९०० ऊस तोडणी यंत्र खरेदीसाठी अनुदान देण्यात येणार आहे. सदर परिस्थिती विचारात घेता ऊस तोडणी यंत्राच्या खरेदीसाठी वैयक्तिक शेतकरी, उद्योजक, सहकारी व खाजगी साखर कारखाने, शेती सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था यांना अनुदान उपलब्ध करुन देण्याची बाब शासन निर्णय घेतला आहे .३२ व्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समितीच्या ११ जानेवारी २०२३ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.महाराष्ट्र राज्यात मागील हंगामातील ऊस लागवडीखालील क्षेत्र १४.८८ लाख हेक्टर इतके असून १३२१ लाख मेट्रीक टन इतके ऊसाचे गाळप झाले आहे.मागील काही हंगामात राज्यातील ऊसतोडणी मजूरांची संख्या कमी होत असल्यामुळे ऊस तोडणीची समस्या सोडवण्यासाठी भविष्यात ऊसतोडणी वेळेवर होण्यासाठी ऊस तोडणी यंत्राव्दारे करणे गरजेचे झाले आहे.

# चिंचोटी येथे शिवजयंती उत्सवानिमीत्त ज्ञानेश्वर माऊली कोठुळे यांचे किर्तन

वडवणी : प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे छत्रपती शिवाजी महाराज शिवजयंती उत्सवानिमित्त झी टॉकीज फेम श्री ह भ प धर्मभुषण शिव किर्तनकार ज्ञानेश्वर माऊली कोठुळे भिवंडीकर यांचे शुक्रवार दि ३१ मार्च रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत भव्य दिव्य स्वरूपात किर्तन होणार आहे.तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी शिवकीर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ चिंचोटी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



सविस्तर वृत्त असे की रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव सोहळा या वर्षी चिंचोटी येथील शिव भक्तांनी डोळ्याचे पारण फेडणारा आगळयावेगळया स्वरूपामध्ये लहान थोर महीला पुरुष सर्व समाज बांधवांच्या सहभागाने भव्य दिव्य स्वरूपामध्ये साजरा करण्यात येत आहे.यामध्ये राजा हरिश्चंद्र संस्थानचे मठाधिपती श्री ह भ प भगवान महाराज राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली व मृदंग सम्राट पखवादाचे बादशाहा श्री भरत महाराज पठाडे यांच्या प्रमुख उपस्थीतीत शुक्रवार दि ३१ मार्च रोजी झी टॉकीज फेम श्री ह भ प धर्मभुषण शिव किर्तनकार ज्ञानेश्वर माऊली कोठुळे भिवंडीकर यांचे रात्री ९ ते ११ या वेळेमध्ये भव्य दिव्य स्वरूपात शिव कीर्तन होणार आहे.तरी तालुक्यातील व पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी या शिव कीर्तनाचा आवश लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ चिंचोटी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विघ्नसंतोषी लोकांवर कडक कारवाई करणार : कुमावत

केज : प्रतिनिधी

सण, उत्सव हर्ष उल्हासाने साजरे करावेत. डीजे आणि कर्णकर्कश आवाजाच्या वाद्यांना परवानगी नाही. तर रामनवमी, रमजान ईद, हनुमान जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या उत्सवात विघ्न आणून शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या विघ्नसंतोषी लोकांवर कडक कारवाई केली जाईल. असा इशारा सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी दिला आहे. केजमधील शांतता समिती बैठकीत ते बोलत होते.

(पान १ वरु)वडवणी येथील शासकीय आयटीआयची

विद्यार्थिनी प्रशिक्षण घेत आहेत.त्यांना प्रशिक्षण देणारे शिक्षक हि तळमळीने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करतात त्यांना हि अपुऱ्या जागेत व अपुऱ्या सुविधात काम करावे लागते तसेच याठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही अपुऱ्या जागेत शिक्षण घ्यावे लागते तसेच पिण्याच्या पाण्याची सोय नाही, सुसज्ज बाथरूम,शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही यासह अनेक सुविधाचा अभाव आहे तसेच जागे अभावी वेल्डर, मोटार मेकॅनिक,मशिनिस्ट हे ट्रेड बंद असून लाखो रुपयांचे मशीनरी, वाहन हे जाग्यावर धुळखात पडुन आहेत. शासन महिन्याला पगारी साठी लाखो रुपये खर्च करते तसेच या शासकीय आयटीआयच्या जागेचा व इमारतीचा प्रश्न अद्यापही मार्गी लागलेला नाही तसेच या आयटीआयचा कारभार प्रभारी प्राचार्य बंनगे यांच्यावर रामभरोसे सुरू आहे.तरी या शासकीय आयटीआयची दुरावस्था झालेलि आहे.

### जाहीर प्रगटन
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२८/०३/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. ज्ञानेश्वर कारभारी जाधव, २. उत्तरेश्वर बलभीम जाधव

यांनी मोहल्ला गट नं. ४२५ मधील प्लॉट नं. मधील प्लॉट/घर क्रमांक ३५१३ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : डॉ.डिगे, पश्चिम :२० फुट रस्ता, दक्षिण : गणेश अशोक, उत्तर : संतोष चव्हाण वगैरे, आकार : लांबी पुर्व पश्चिम -६० फुट, रुंदी दक्षिणोत्तर ३३ फुट चे एकूण क्षे.१८४.१ चौ.मी.वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२८/०३/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. गणेश नवनाथ म्हैत्रे

यांनी मोहल्ला गट नं... मधील प्लॉट नं. मधील प्लॉट/घर क्रमांक १७९७/१ त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : २० फुट रस्ता, पश्चिम : नंदकुमार शिंदे, दक्षिण : चंपाबाई नवनाथ म्हैत्रे, उत्तर : अनंत नरहरी आंधळे. आकार : लांबी दक्षिणोत्तर-४० फुट, रुंदी पुर्व पश्चिम ३१.३ फुट चे एकूण क्षे.१८४.१ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

### जाहीर प्रगटन
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२८/०३/२०२३

सर्व जनतेस याद्वार कळविण्यात येते की, श्री. हुसेनाबी निसारअली शेख

यांनी मोहल्ला गट नं.४४६ मधील प्लॉट नं. मधील प्लॉट/घर क्रमांक ---- त्यांचे नावे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जानुसार जागेची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्व : रस्ता, पश्चिम : दिलीप मुंडे यांचा प्लॉट, दक्षिण : डोंगर यांचा प्लॉट, उत्तर : विष्णु महामुनी यांचा प्लॉट. आकार : पुर्व पश्चिम १२.१९ मी व दक्षिणोत्तर ०७.६२ मी. एकूण क्षे.९३ चौ.मी.

वरील नामांतराबाबत कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसाचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्री पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे.

मुदतीनंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**लिपीक,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि.२९ मार्च २०२३ । पान ४

## बीड जिल्ह्यातील युवक कल्याणचे प्रस्ताव निकाली काढा : मस्के

बीड :क्रीडा विभागातील युवक कल्याण योजने अंतर्गत बीड जिल्ह्यातील क्रीडा मंडल तथा स्वयंसेवी संस्थांनी अनेक युवक कल्याणचे प्रस्ताव जून २०२२ दरम्यान जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्याकडे दाखल आहेत. हे प्रस्ताव निकाली काढण्यासाठी तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी. असे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी राज्याचे ग्रामविकास तथा क्रीडा मंत्री ना. गिरीशजी महाजन यांना लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे. आज संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे क्रीडा मंडल, स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकारी शिष्ट मंडळाने भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद मस्के यांना लेखी निवेदन दिले. या शिष्ट मंडळात विजय पोकळे, विठ्ठल जाधव, बापूसाहेब जाधव सहभागी होते.

# आ.सोळंके यांचे पी.ए.महादेव सोळंके यास अटक

## भाजपा कार्यकर्ते अशोक शेजुळ हल्ला प्रकरण

माजलगाव:प्रतिनिधी

येथील भाजपाचे कार्यकर्ते अशोक शेजुळ यांच्यावर हल्ला केल्या प्रकरणात येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. प्रकाश सोळंके यांचे स्वीय सहाय्यक महादेव सोळंके यास पोलिसांनी केज येथे चौकशीला बोलावून अटक करून आता आ. प्रकाश सोळंके पोलिसांच्या रडारवर येऊ शकतात.

माजलगाव पोलीस ठाण्यात आनण्यात आले. या अटकेमुळे येथील भाजपाचे कार्यकर्ते अशोक शेजुळ यांनी आ.प्रकाश सोळुंके,त्यांच्या पत्नी मंगला प्रकाश सोळंके,उद्योगपती रामेश्वर टवाणी यांच्या विरोधात विविध संस्थेत केलेल्या भ्रष्टाचारा विरोधात न्यायालयात ३ मार्च रोजी जनहित याचिका दाखल केली होती.त्यानंतर ७ मार्च रोजी धुलीवंदनाच्या दिवशी अशोक शेजुळ याच्यावर सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास अज्ञात पाच जणांनी हल्ला केला होता.यात शेजुळ



गंभीर जखमी झाले होते. शेजुळ यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिसात आ.सोळंके पती-पत्नीवर ३०७ चा गुन्हा दाखल झाला होता.

यातील पाच आरोपींना पोलिसांनी चार ते पाच दिवसात अटक केली होती.त्यानंतर पोलीस सहाय्यक अधीक्षक पंकज कुमावत यांनी आमदार सोळंके पती-पत्नी सह १० ते १२ जणांची कसून चौकशी केली होती. यात आ.प्रकाश सोळंके यांचे स्विय सहाय्यक महादेव सोळंके यास मंगळवार रोजी दुपारी तपास कामी बोलावले असता या मारहाण प्रकरणात महादेव सोळंके यांनी कबूल केल्याचे उघड होताच त्यास ५ वाजता केज येथे अटक करून माजलगाव शहर पोलिसात रात्री उशिरा आणण्यात आले. महादेव सोळंके याच्या अटकेमुळे आ.सोळंके यांच्या अडचणीत वाढ झाली असून ते आता पोलिसांच्या रडारवर आहेत.



**अभिनंदन..!**

छत्रपती संभाजीनगर येथील ओऐस्टर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजमध्ये बी फार्मसी च्या पहिल्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या कुमारी प्रज्ञा अनिल वाघमारे हिने तिच्या वर्गात बेस्ट स्टुडन्ट अवॉर्ड मिळवल्याबद्दल तिचं सर्वत्र कौतुक केले जातेय..

# मामला येथे रामनवमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

वडवणी :प्रतिनीधी

अखील कोटी ब्रम्हांडनायक भगवान पंढरीश पांडुरंगाच्या कृपाशीर्वादाने व सकल संत मंहतांच्या उपस्थित मामला ग्रामस्थांच्या सहकार्याने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राम नवमी ते हनुमान जयंतीच्या दरम्यान भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होणार आहे. यामध्ये आठ दिवस किर्तन, ग्रंथ राज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, गाथा भजन,श्रीमद्? भागवत कथा सह विवीध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी तालुका भारतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मामला येथील ग्रामसथांच्या करण्यात आले आहे.

दरवरषीप्रमाणे प्रमाणे याहीवर्षी वडवणी तालुक्यातील मामला येथे दिनांक ३० मार्च वार गुरवार रामनवमी ते ०६एप्रिल वार गुरवार हनुमान जयंतीच्या दरम्यान मामला येथे अखंड हरिनाम सप्ताह दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जात होता यावर्षीही तेवढ्यात उत्साहात आठ दिवस विविध कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे यामध्ये सखाराम महाराज बोबडे, बबन महाराज शिंदे, पुंडलिक महाराज शिंदे, भजनानंदी हरिदास महाराज सोळंके गुरुजी, शिवचरीत्रकार अशोक महाराज आजबे, महादेव महाराज जाधव, वेदांतचार्या विष्णुपंत महाराज गोंडे, भागवताचार्य सच्चिदानंद महाराज जाधव यांचे किर्तन होणार आहेत.तसेच या सप्ताहात काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, श्रीमद्? भागवत कथा, हरिपाठ इत्यादी धार्मिक कार्यासह आठ दिवस रामनामाचा जयघोष होणार आहे. तसेच महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य बाबासाहेब पाटिल भोसले यांच्यासह ईतर मृदंगाचार्य गायनाचार्य यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या सप्ताहात आठही दिवस मोठ्या प्रमाणात यजमानांचे वतीने अन्नदान होणार आहे वरील सर्व धार्मिक कार्यासाठी तालुका भरासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी मामला यांच्या वतीने करण्यात आले आहे.




# जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांना उद्योजक गोरख मुंडे व परिवाराकडून दिल्या शुभेच्छा



अंबाजोगाई : प्रतिनिधी

बीडच्या नुतन जिल्हाधिकारी तथा परळीच्या स्नुषा सौ.दिपा मुधोळ-मुंडे या गुढीपाडव्याच्या निमित्ताने कन्हेरवाडी ता.परळी या ठिकाणी सासुरवाडी येथे आल्यानंतर त्यांना अंबाजोगाई येथील हॉटेल संतोष पॅलेसचे मालक तथा उद्योजक व प्रगतशील शेतकरी गोरखबापू मुंडे व त्यांच्या कुटूंबियांनी दिपा मुधोळ यांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देवून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

सौ.दिपा मुधोळ-मुंडे या आय.ए.एस. असून उस्मानाबाद येथे मागच्या काळात जिल्हाधिकारी म्हणून उत्कृष्ट कार्य केलेले आहे. तसेच नुकतीच त्यांची बीड येथे बीडच्या जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झालेली आहे. गेल्या महिन्याभराच्या कालखंडात त्यांनी जिल्हाधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. त्यांच्या कामाचा गौरव आणि गुढीपाडव्याचे निमित्त साधून त्यांना गोरखबापू मुंडे यांनी सहकुटूंब कन्हेरवाडी येथे जावून सौ.दिपा मुधोळ-मुंडे यांना गुढीपाडव्याच्या व हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा देवून त्यांच्या कामाचे कौतुक केले. तर सौ.दिपा मुधोळ-मुंडे यांनीसुध्दा मुंडे परिवाराचा सन्मान स्वीकारुन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी गोरखबापू मुंडे यांनी वेगवेगळ्या विषयांवर मुधोळ यांच्याशी चर्चा करुन अंबाजोगाई शहरातील वेगवेगळे विषय सांगितले. यावेळी गोरखबापू मुंडे यांच्या सुविद्य पत्नी सौ. शालीनीताई मुंडे यांच्यासह इतर उपस्थित होते.




## शासन निर्णयाचे स्वागत!

भिडे वाडा स्मारकासाठी पन्नास कोटी रुपयांचा निधी दिल्याबद्दल व ओबीसींची जातीय जनगणना करण्याची घोषणा केल्याबद्दल राज्य सरकारचे आभार व्यक्त करून आनंदोत्सव साजरा करताना महात्मा फुले युवा दलाचे जिल्हाप्रमुख अजय शिंदे ,अशोक रासवे, तुकाराम राऊत ,मारुती नाना शिंदे , बाबूराव वणकर, दादासाहेब ढगे ,अशोक शिंदे जनार्दन खंडागळे, वैभव शिंदे, सिद्धू रासवे.




**आळणे हॉस्पिटल**
ॲक्सिडेंट ऑर्थोपेडीक, ट्रामा केअर ॲन्ड डायग्नोस्टिक सेंटर
डॉ.एस.एल.आळणे
एम.बी.बी.एस. (अस्थिरोग तज्ञ)
मो.९४२०४१६३४३
डॉ.स्नेहा एस.आळणे
एम.बी.बी.एस. (कन्सल्टंट रेडिओलॉजीस्ट)
पत्ता : साठे चौकाजवळ, जालना रोड, बीड.
फोन ०२४४२-२२९९४९
















हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)